REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# मानवाधिकार आणि सामाजिक समावेशकता




डॉ.सचिन गौतम इंगळे[1] , डॉ. पुष्पांजली सचिन इंगळे [2]
[1](M.A. M.Ed., M.Phil., Ph.D., NET-SET)
सहाय्यक प्राध्यापक सोशल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर.
[2](M.Sc., M.Ed., Ph.D., NET-SET)
सहाय्यक प्राध्यापक, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर ( एम.एड विभाग )

## संशोधन विषय विवेचन

**'सर्वे भवन्तु सुखिनः'** या प्रमाणे आपल्याबरोबर सर्वांनी सुखी रहावे हा मानवाधिकार शिक्षणाचा प्रमुख उद्देश होय.सर्व व्यक्ति या ईश्वरासमोर, निसर्गासमोर समान आहेत मात्र वंश, धर्म, जात, पंथ, लिंग, विशिष्ट रोगाच्या लागणावरुन माणसामाणसांमध्ये भेदभाव केला जातो आणि त्याच्या स्वातंत्र्यावर गदा येते. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या मनाप्रमाणे जीवन जगण्याचा विचार करण्याचा, स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याचा अधिकार असावा. तसेच सर्व लोकांसाठी समान नियम, कायदे, संधी असाव्यात या उद्देशाने मानवाधिकाराची संकल्पना उदयास आली. मानवाधिकार बाबत बालकांना त्यांच्या गरजानुसार सर्वसामान्य शिक्षण योजनेत सामान्य मुलांमध्ये सहभागी करुन घेणे म्हणजे समावेशित शिक्षण होय.'

## प्रास्ताविकः

### मानवाधिकार आणि शिक्षण:

"मानवाधिकार शिक्षण म्हणजे लोकांनी वैयक्तिक रित्या आणि गटामध्ये स्वतःला मानवी हक्काचे उल्लंघन करण्यापासून संरक्षण मिळविण्यासाठी आणि त्यांनी केलेल्या चुका सुधारण्यासाठी ज्ञान व दृष्टीकोन प्राप्त करणे. एकूणच मानवाधिकार आणि शिक्षण म्हणजे स्वतःच्या व इतरांच्या हक्का विषयी माहिती करून घेणे, आपले हक्क व त्यांचे संरक्षण यांची जाणीव जागृती लक्षात घेऊन ज्ञान व दृष्टीकोन प्राप्त करणे व मानवी मूल्यांची जपणूक करणे होय.

### समावेशित शिक्षणाचा ऐतिहासिक आढावा:

१) UNESCO ने 1948 मध्ये The Right to Education mentioned in Article 26 universal declaration of Human Rights मध्ये दिले.

२) 1966 मध्ये International convent on Economic Social & Cultural Rights
Reaffirms the right to Education for all and highlight three principle.

३) भारतामध्ये सर्व शिक्षा अभियान योजनेव्दारे सामाजिक समावेशकता याचा संदर्भ देऊन समावेशकतेबाबत विशेष विवेचन केले आहे.

### समावेशित शिक्षण:

समावेशित शिक्षणाचा विचार सर्व शिक्षा अभियानात केला गेला आहे. 'बालकांना त्यांच्या गरजानुसार सर्वसामान्य शिक्षण योजनेत सामान्य मुलांमध्ये सहभागी करुन घेणे म्हणजे समावेशित शिक्षण होय.'

**Thought of Inclusion Education:**

"Inclusion Education based on the right of learners to equality education that meets basic learning needs and enriches lives, focusing particularly on vulnerable and marginalized groups it seeks to develop that full potential of every individual.

The ultimate goal of inclusive quality education is to end all forms of discrimination and foster Social Cohesion

वरील व्याख्यावरून असे लक्षात येते की,

- अपंग विद्यार्थ्यांना सर्व सामान्यांच्या बरोबरीने शिक्षण देणे.
- समावेशित शिक्षणासाठी प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अधिकार आहे.
- मूलभूत अध्ययनाच्या गरजाची पूर्तता करणे व शिक्षणाव्दारे व्यक्तीचे जीवन समृध्द करणे.
- अध्ययन पातळीच्या काठावरील व सहज परिणाम होईल अशा समूहावर लक्ष केंद्रीत करणे.
- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या विकास होण्यासारख्या क्षमतांचा शोध घेणे व त्यांचा विकास करणे
- समाजातील सर्व प्रकारच भेद नष्ट करून समाजात एकोपा वाढविण व सर्वांना सामावून घेणे.

- **सामाजिक समावेशकताः**

Social inclusion of certain rights to all individuals and groups in society. Such as employment adequate housing, health, care education and training etc.

'समाजातील प्रत्येक नागरिकाला रोजगार मिळण्याचा योग्यराहणीमानाचा, आरोग्याचा, शिक्षणचा व्यक्तीच्या सर्व बाजूंचा विकास तसेच व्यक्तीला सर्व प्रशिक्षित बाबी मिळविण्याचा अधिकार असतो त्याला समावेशकता असे म्हणतात.

सामाजिक समावेशकता म्हणजे असा समाज की, त्या समाजात लोकांना स्वतःला आदर आहे. तसेच आपल्यातील भेद किंवा वेगळेपणा यांचा समाजात आदर केला जातो असं वाटलं पाहिजे. तसेच त्यांच्या मूलभूत गरजा योग्य तऱ्हेने पूर्ण झाल्या पाहिजेत व समाजातील प्रत्येक व्यक्तिचा सामाजिक, आर्थिक, राजकिय व सांस्कृतीक संस्थांमध्ये समावेश असला पाहिजे.

'अशा सकारात्मक वृत्ती की ज्याद्वारे समानता प्राप्तीसाठी समूहातील समाजातील प्रत्येक नागिरिकांना चांगल्या सोयीसुविधा देणे तसेच प्रत्येकाला सांस्कृतिक व सामाजिक दर्जा वाढविण्यासाठी प्रेरित करणे आणि सामाजिक' जाणिवेतून दुराचारासारख्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी जाणिव, जागृती निर्माण करणे.

- **सामाजिक समावेशकतेची गरजः**

समानातील काही व्यक्तींना व समूहाला सामाजिक विकासापासून वेगळे ठेवले गेल त्यांच्यामध्ये भेदाभेद केला गेला व एक प्रकारची सामाजिक, आर्थिक, आरोग्य, सांस्कृतिक, अविकसीततेची दरी निर्माण झाली व यातून विविध समस्या निर्माण झाल्या त्यातील काही

| | |
|---|---|
| १) बेरोजगारी | २) कौशल्य विरहित शिक्षण दुय्यम प्रतीचे शिक्षण |
| ३) दुषित सामाजिक आरोग्य | ४) कमी प्रमाणात अर्थाजन |
| ५) गुन्हे | ६) राहणीमानाचा खालावलेला दर्जा व स्थानिक परिसर |

- **राष्ट्रीय पातळीवर मांडलेली सामाजिक समावेशक शिक्षणाची मुख्य दोन उद्दिष्टे**

१) सर्व व्यक्तींना समान संधी, समान न्याय व सहभाग प्राप्त करून देणे.

२) सामाजिक समावशिकतेत येणारे अडथळे ओळखून ते दूर करण्यासाठी शासन जबाबदारी घेईल आणि आवश्यकतेनुसार त्याची योग्य त्या वेळी व्यक्ती विकसनासाठी गणना करण्यात येईल.

- **सामाजिक समावेशिकतेला आधार देणारी मूल्ये**

१) प्रत्येक व्यक्ती कुशल, सज्ज व्यक्तीमत्व आहे. (Everyone Is Ready)

२) प्रत्येक व्यक्ती अध्ययन करु शकतो. (Everyone Can Learn.)

३) प्रत्येक व्यक्तीला गरजेनुसार साहय करावे. (Everyone Needs Support.)

४) प्रत्येक व्यक्ती इतर व्यक्ती समुहाबरोबर संवाद साधू शकतो. (Every Can Communicate.)

५) एकतेत आम्ही उत्कृष्ट आहोत' हे मूल्य निर्माण करावे. (Together We Are Better)

- **विशेष करुन सामाजिक समावेशकतमध्ये खालील बाबींची गणणा केली जाते.**

1) विशेष गरज असलेली बालके

2) स्त्रिया वृध्द स्थलांतरित व्यक्ति

3) एड्सग्रस्त व एच आय व्ही बाधीत

4) राहणीमान आहारदर्जा

5) बालमजूर

6) शिक्षण व आरोग्य

7) बेरोजगारी

8) शिक्षणापासून वंचित असणारा समाज

9) कायदेनुसार सामाजिक संरक्षण

10) मागासलेला समाज व आदिवासी लोक

- **मानवाधिकार शिक्षणाच्या दृष्टीकोनातून व्यक्तीच्या सामाजिक समावेशकतेसाठी**
- **शासनाची भूमिका:**

- भारतीय संविधानाच्या ३ ज्या विभागात कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूची तरतूद आहे.
- कलम ४५ 'अ' अन्वये समाविष्ट बाबीनुसार प्रत्येक व्यक्तीला वयाच्या ६ ते १४ शिक्षण मोफत व सक्तीचे केले आहे
- सामाजिक आरोग्य स्थिर राहण्यासाठी:

1) एड्सग्रस्त व आयव्ही बाधीत व्यक्तीसाठी मार्गदर्शन व समोपचार केंद्र व मोफत औषध पुरवठा (ARVT) केला जातो.

2) एड्सग्रस्त व एचआयव्ही बाधीत व्यक्तींना समाजात सामावून घेण्यासाठी शासनामार्फत त्यांच्या विचारांना, मताना, संवाद भूमिकला प्रतिसाद देण्यासाठी विविध उद्बोधन वर्ग, पथनाटय, चर्चासत्रे समाजासमोर मांडली जात आहेत.

3) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजनेमार्फत आरोग्याच्या सोई-सुविधा दिल्या जात आहेत.

4) शिक्षणासाठी 'सर्व शिक्षण अभियान योजना निरंतरीत करून नव-नविन उपक्रम नाविण्यपूर्ण व समान संधी उपलब्ध करुन दिले जात आहे.

5) १०० दिवसाची राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना.

- **दारिद्रय निर्मूलनासाठी**

1. ग्रामीण वस्ती सुधारणा
2. सामाजिक समान सहभाग
3. आर्थिक, रोजगार संधीच पूर्णवतरण धोरण राबविले जात आहे.

- **राहणीमान सुधारण्यासाठी.**

1) योग्य प्रकारची घरे बांधणीचा निधी दिला जात आहे.

2) पोषक आहारासाठी स्वस्त धान्य उपलब्ध करून दिले जात आहे.

- समाजात एकोपा राहण्यासाठी.
- सर्व व्यक्तीचा निर्णय प्रक्रियेत सहभाग.
- गुहारी प्रवृतीला आळा घालण्यासाठी स्थानिक लोकसहभागातून व ग्रामीण भागातील लोकांमध्ये सलोखा सामंजस्य राखण्यासाठी तंटामुक्त गाव यासारख्या योजना आहेत.

- शेती व्यवसायाला आधुनिकतेची जोड व रोजगार निर्मिती

शेती तंत्रज्ञानात बदल घडवून नाविण्य व आपत्ती व्यवस्थापनासाठी उपाय योजना आहेत.

- सर्वसामान्य मुलाबरोबर अंध, अपंग, बहिरे, मतिमंद, अपसामान्य/अपवादात्मक विशेष गरज असलेल्या बालकांसाठी

  1) तंत्रशाळा

  2) विशेष वर्ग विशेष शाळा, योग्य ते आरोग्य मार्गदर्शन व देखभाल तसेच आरोग्य शिबीर, मोफत औषधोपचार दिला जात आहे.

### महिलांसाठी उपाय:

१) शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून दिली जात आहे.

२) विशेष वर्ग व प्रोत्साहन शिष्यवृत्या दिल्या जात आहेत.

३) विशेष महिला संरक्षणासाठी कायदा तरतूद.

४) प्रसूतीपूर्वी रजा व प्रसुती नंतर रजा उपभोगण्याची सोय करून देण्यात आली आहे.

५) बालकांचा कुपोषितपणा टाळण्यासाठी महिलांना आरोग्य विषयक मार्गदर्शन, पोषक आहार योग्य उपचार आणि मोफत औषध पुरवठा करण्याच्या विविध योजना कार्यरत आहेत

### मानवाधिकार शिक्षणाच्या दृष्टीकोनातून सामाजिक समावेशकता प्रभावीपणे कशी निर्मित करता येऊ शकेल

**Living full live about, learning to live together: याप्रमाणे प्रत्येकाचे वर्तन, विचाराधारा जोपासावी.**

Inclusion is NOT JUST A DISABILITY ISSUE AND HIV/AIDS BUT 'Inclusion can create and shares, tools, resources capacities, so all can

**Live full lives** असाच व्यापक विचार समाजातील प्रत्येक नागरिकांन करावा

३) सामाजिक समाविशकता म्हणजे समाजातील सर्व घटकांना सामावून घेण त्यांचा अंतर्भाव करुन घेणे म्हणजे काय तर,

Inclusion means - Change and change are inevitable

४) सामाजिक समावेशकता निर्माण करण्यासाठी तीन मुख्य बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे.

**Social Inclusion: * We must all be one big * Inclusion cares all ills. * We are really all the same.**

५) समाजातील प्रत्येक नागरिकाने सकारात्मक सहभाग देऊन आर्थिक, सामाजिक, पर्यावरण संतुलन ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

६) व्यक्ती व्यक्तीमधील असमानता, दारिद्रय यांना दूर ठेवून प्रत्येकाला समान संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे.

७) समाजामध्ये प्रत्येकाची मते जाणून घेणारा व विविध प्रकारची मतप्रणाली मानणारा आणि सामाजिक जाणीव असणारा समजूतदार समाज निर्माण केला पाहिजे.

औपचारिक व अनोपचारिक शिक्षणाव्दारे विविध स्तरावर मानवाधिकार व शिक्षण आणि सामाजिक समावेशकता पाठयक्रमाची व अभ्यासक्रमाची रचना केली गेली पाहिजे, म्हणजेच 'access to success

९) सामाजिक समावेशकता साधण्यासाठी अभ्यासक्रमाव्दारे शाळा व समाजामध्ये सामाजिक सामजस्य व सामाजिक बांधिलीको बाबतची अर्थपूर्ण आंतरक्रिया झाली पाहिजे.

### विशेषतः सामाजिक समावेशकता निर्मितीसाठी शासन पातळीवर करावयाच्या बाबी:

१) प्रातिनिधीक लोकशाही (Representative Democracy)

२) निर्णय प्रक्रियेत सहभाग करून घेणारी लोकशाहीची अंमलबजावणी (Participative Democracy)

३) रोजगाराची समानसंधी उपलब्ध करावी (Empowerment)

४) सामाईक मालकी समाज विकास साधावा (Community Development)

५) समाजकार्य सहभाग (Community work)

६) मानवी लोकसंख्या आयुमान व सोई यांचा अभ्यास करावा (Demographic Agency)

७) विकासापासून दूर तसेच विकासाच्या काठावरील व्यक्तिना, समाजाला विकास प्रक्रियेत सामावूनघ्यावे (Marginalization)

८) विविधतेत एकता बहुसंस्कृतीत्व अस्तित्वात आणावे (Multiculturalism)

९) दारिद्रय निर्मूलन करावे, त्यांना पायाभूत सुविधा व आवश्यक त्यावेळी गरजांची त्याचवेळेस पूर्तता करावी. (Poverty)

१०) प्राप्त प्रमाण आर्थिक दारिद्रय यांच्यामध्ये योग्य समन्वय साधावा. (Relative Income Poverty)

- **सामाजिक समावेशकता वाढीसाठी शिक्षणाची भूमिका:**
- शिक्षणाविषयीचा उदासिन दृष्टीकोन दूर करावा म्हणजे

उदा १) दारिद्रय रेषेखालील पालकांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देऊन,

२) डोंगराळ भागात तसेच मागास, आदिवासींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रत्यक्ष शिक्षण त्यांच्यापर्यंत पोहोचविणे

- स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून त्यांना योग्य मार्गदर्शन, प्रेरणा तसेच सोई-सुविधा देऊन.
- भारतीय वातावरणातील मानवी विकासाला बांधा ठरणाऱ्या मित्रता दूर ठेवणे

1) धार्मिक भिन्नता 2) वांशिक भिन्नता 3) जाति भिन्नता 4) सांस्कृतिक भिन्नता 5) भाषिक भिन्नता 6) लिपी भिन्नता 7) आर्थिक भिन्नता

- **शिक्षण आणि समावेशित शिक्षणाचा समतोल विकास साधण्यासाठी.**

१) स्त्री-पुरुषांना समान दर्जा द्यावा

२) दुःख पिडीत व्यक्तींना त्यांच्या गरजेनुसार मार्गदर्शन, संधी, प्रेरणा द्यावी.

३) भेदविरहीत दृष्टीकोन निर्मितीस प्रोत्साहन छाये

४) पारंपारिकता व आधुनिकता यांना योग्य ते स्थान असावे

५) ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाचा समतोल साधाय

६) विविधतेत एकता मानावी

- **सामाजिक समस्या दूर ठेवाव्यात.**

१) लोकसंख्या नियंत्रणात ठेवावी.

२) धार्मिक सलोखा निर्माण करावा.

३) जातीजातीतील भेद-ताण बाजूला ठेवून '**आपण एक**' हे लक्ष्य ठेवावे

४) प्रादेशिकता न जोपासता राष्ट्राला महत्त्व द्यावे

५) अंधविश्वास, रूढी, परंपरांना फाटा द्यावा.

६) नितीधैर्य, नैतिक मूल्यांची ओळख जोपासना करावी.

(७) सामाजिक बांधिलकी व सलोखा, सहकार्य, प्रेम, बंधुत्व, शिस्त वाढीस लावावी.

यावरुन मानवाधिकार शिक्षण आणि सामाजिक समावेशकता (Inclusion) यांचा परस्परसंबंध आहेच पण त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणजे समावेशकता ही संकल्पना फक्त बंचित, अपवादात्मक, विशेष गरज असलेल्या बालकांच्या समस्यांशी अथवा एचआपकी/ एड्स बाधीत व्यक्ती तसेच सामाजिक समस्येशी मर्यादीत स्वरुपात नसून ती एक अत्यतीक व्यापक असा एक मानव विकास निर्मितीचा नव दृष्टीकोन आहे. म्हणून सामाजिक समावेशकता निर्माण करण्यासाठी आर्थिक, धार्मिक, सामाजिक, राजकिय, सांस्कृतीक, आरोग्य आणि पर्यावरण विषयक असा समानसंधीच्या पर्याप्ततेचा विचार करणे आवश्यक वाटते

म्हणून असे म्हणावे वाटते की, **'स्वतःचा विचार न करता चिं ता करतो या विश्वाची आणि शेवटी 'बहुजन हितायः बहुजन सुखाय' यामध्येच मानवाधिकार आणि सामाजिक समावेशकता प्रतिबिवीत झालेली दिसून येते.**

## संदर्भ ग्रंथ सूची:

१) दुनाखे अरविंद देशपांडे लीना(२००७). प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे नित्यनूतन प्रकाशन २) दुनाखे अरविंद(२००६), पर्यायी शिक्षणपध्दती, पुणे नित्यनूतन प्रकाशन

३) मिलेगांवकर एस. डी. मोरे सी.एस. (२००८), शिक्षक शिक्षण, पुणे नित्यनूतन प्रकाशन

४) जगताप ह ना (२००८), शिक्षणातील नववाह व नवप्रवर्तने, पुणेः नित्यनूतन प्रकाशन

५) पेंडके प्रतिभा सुधीर (२००५), भारतीय शिक्षण पध्दतीचा विकास, पूर्ण नित्यनूतन प्रकाशन

6) Human Rights Retrieved http://en.wikipedia.org/wiki/human-rights

7) What is inclusion retrieved http://www.inclusion.com/inclusion html

8) Inclusion in Education Retrieved http://www.unesco.org/en/inclusive

9) Human Right and Social Inclusion Retrieved http://www.darkand light.eu/content/2134/35 police paper.html